CMYK

दैनिक

www.arambhmarathi.com

# आरंभ मराठी

सुविचार

स्वप्ने पाहा, पण स्वप्ने पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम करा.



शिराढोणच्या जिल्हा परिषद शाळेत माजी विद्यार्थ्यांचा पन्नास वर्षानंतर स्नेहमेळावा

पेज ४

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 121 ■ मंगळवार दि. 10 जून 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

## तुळजाभवानी मंदिर संस्थान पुण्यातील चितळेंची तुंबडी भरणार

# लाडूचा हट्ट कशासाठी? भक्तांना हवाय पेढ्याचा प्रसाद

### पेढ्यामुळे जिल्ह्यातील दूध उत्पादक शेतकरी, स्थानिक व्यावसायिकांना मिळेल रोजगार

चंद्रसेन देशमुख | आरंभ मराठी


**धाराशिव :कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या भाविकांना प्रसाद म्हणून पुण्यातील चितळेंचे लाडू देण्याचा निर्णय तुळजाभवानी मंदिर संस्थानने घेतला आहे. वास्तविक पाहता धाराशिव जिल्ह्यातील खवा आणि पेढे देशभरातील देवस्थानांमध्ये प्रसिद्ध असताना तुळजाभवानी मंदिरात पेढ्याऐवजी लाडूचा हट्ट कशासाठी, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. जिल्ह्यात दुग्ध आणि खवा उत्पादन मोठ्या प्रमाणात असताना तसेच जिल्ह्यातील शेतकऱ्यांना, व्यावसायिकांना रोजगार वाढवणे शक्य असताना मंदिर संस्थानने पेढ्याऐवजी लाडूचा हट्ट कशासाठी धरला, अशी विचारणा होत आहे.**

जिल्ह्यातील कुंथलगिरीचा पेढा देशात सर्वदूर पोहोचला आहे. या भागातील खवा आणि पेढ्याने भारतातील प्रत्येक देवस्थानातील बाजारपेठ काबीज केली आहे. चविष्ट खवा आणि पेढ्याने विशेषत: भूम- वाशी तालुक्याचे नाव सर्वत्र पोहोचवले असून,बहुतांश देवस्थानांकडून प्रसाद म्हणून याच भागातील खवा आणि पेढ्याचा उपयोग केला जातो.केवळ भूम,वाशी तालुक्यातील नव्हे तर जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागात तयार केलेला खवा व्यापाऱ्यांच्या माध्यमातून मुंबई, पुण्यासह वेगवेगळ्या महानगरात पाठवला जातो.उत्पादनात अग्रेसर असलेल्या जिल्ह्यात खवा क्लस्टर होत आहे. सरकारही या व्यवसायाला प्रोत्साहन देत आहे. यामुळे अनेक शेतकऱ्याना जोडव्यवसायातून आर्थिक मदत होत आहे एवढेच नाही तर स्थानिक व्यापाऱ्यांना देखील आर्थिक लाभ मिळत आहे. असे असताना तुळजाभवानी मंदिरात पेढ्याऐवजी लाडूचा प्रसाद देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र,या निर्णयावर मतभिन्नता निर्माण झाली आहे. स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध करण्याऐवजी मंदिर संस्थानने लाडूचा हट्ट कशासाठी धरला आहे,असा सवाल विचारला जात आहे. मंदिर संस्थानच्या वतीने भाविकांना पुण्यातील चितळेंचे लाडू देण्यात येणार आहेत.





### आपल्या भागाची ओळख वाढवा, लाडू नको पेढ्याचा प्रसाद हवा



तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने प्रसाद म्हणून लाडू देण्याचा निर्णय अत्यंत चुकीचा आहे. कोणत्या तरी मंदिरातील कॉपी करण्यापेक्षा आपण आपली स्वतंत्र ओळख निर्माण करायला हवी. पेढा उत्पादन ही धाराशिव जिल्ह्याची ओळख आहे.ती टिकली पाहिजे,वाढली पाहिजे. त्यासाठी मंदिर संस्थानने पुढाकार घ्यावा. लाडूऐवजी भाविकांना पेढ्याचा प्रसाद दिल्यास स्थानिक नागरिकांना रोजगार मिळेल आणि आपला जिल्हा करत असलेल्या उत्पादनाचा देशभर लौकिक वाढेल.

–नागनाथ भांजी, पुजारी,तुळजापूर

### मंदिर संस्थानने लाडूचा हट्ट सोडावा

वास्तविक पेढ्याऐवजी लाडूचा प्रसाद देण्याचा निर्णय घेतला तर स्थानिक दुग्ध उत्पादक शेतकरी, व्यापाऱ्यांना आर्थिक हातभार लागू शकतो. त्यामुळे स्थानिक लोकांना रोजगार देखील मिळू शकतो. मात्र,मंदिर संस्थानने लाडूचा हट्ट धरल्यास भाविकांच्या खिशातील पैसा जिल्ह्याबाहेर जाऊन रोजगाराच्या संधी बुडतील.कारण चितळे यांच्याकडून पुण्यातच लाडू तयार करण्यात येणार आहेत. मंदिर संस्थानने लाडूचा हट्ट सोडावा आणि भाविकांना पेढ्याचा प्रसाद देण्याचा निर्णय घ्यावा,अशी मागणी करण्यात येत आहे.

### उपवासाला लाडू नव्हे,पेढ्याचा प्रसाद हवा

तुळजाभवानी मातेचे बहुतांश भाविक नवरात्रोत्सवात तसेच मंगळवार,शुक्रवार आणि पौर्णिमेला उपवास धरतात. मात्र, उपवासाला डाळीच्या पिठाचे लाडू प्रसाद म्हणून सेवन करता येत नाहीत. पेढ्याचा प्रसाद उपवासादिवशी सेवन करता येतो. त्यामुळे पेढ्याचा प्रसाद कोणत्याही दिवशी चालू शकतो. मंदिर संस्थानने लाडूचा प्रसाद देण्याचा निर्णय घेण्यापूर्वी स्थानिक पातळीवर पुजारी, व्यापारी आणि नागरिकांना विश्वासात का घेतले नाही, असा प्रश्न आता विचारला जात आहे.

## तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात विनोद गंगणे याना गुरूवारपर्यंत पोलीस कोठडी वाढली

आरंभ मराठी | धाराशिव

तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात चार दिवसांपूर्वी अटक करण्यात आलेला आरोपी विनोद गंगणे यांना धाराशिव जिल्हा सत्र न्यायालयाने सोमवारी दिनांक १२ जुनपर्यंत वाढीव पोलीस कोठडी सुनावली. जिल्हा व सत्र न्यायाधीश टी.जी. मिटकरी यांच्यासमोर झालेल्या सुनावणीनंतर वाढीव कोठडीचा निर्णय कोर्टाने दिला. यावेळी कोर्टाने ड्रग्ज प्रकरणातील पोलिसांच्या तपासावर प्रश्न उपस्थित केले. मागील सुनावणीत देखील कोर्टाने पोलिसांच्या तपास यंत्रणेवर स्पष्ट शब्दात नाराजी व्यक्त केली होती. आरोपी विनोद गंगणे यांना दिनांक ६ जुन रोजी अटक केली होती. त्यांना ९ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती. सोमवारी पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर त्यांना पुन्हा एकदा कोर्टात हजर करण्यात आले. यावेळी झालेल्या सुनावणीत गंगणे यांना तीन दिवसांची वाढीव कोठडी सुनावली. तुळजापूर ड्रग्ज प्रकरणातील आरोपींचे पोलिसांनी सेवन आणि



तस्कर असे दोन गट केले असून, यावरही कोर्टाने प्रश्न उपस्थित केले आहेत. राजकीय पक्षांकडूनही

### अखेर एकाला जमीन मंजूर

तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात धाराशिव कोर्टाने अखेर एका आरोपीला सोमवारी (दि.९) अटकपूर्व जामीन मंजुर केला. जिल्हा व सत्र न्यायाधीश टी. जी. मिटकरी यांनी आलोक काकासाहेब शिंदे या आरोपीला अटकपूर्व जामीन मंजुर केला. आरोपीच्या बाजूने ऍड. विशाल साखरे यांनी कोर्टात बाजु मांडली. आलोक शिंदे हा सेवन गटातील आरोपी आहे.

पोलिसांच्या तपासावर संशय व्यक्त करण्यात येत असून, तुळजापूर ड्रग्ज प्रकरणाचा तपास स्वतंत्र यंत्रणेमार्फत करावा अशी मागणी खासदार ओमराजे आणि आमदार कैलास पाटील मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. ड्रग्ज प्रकरणात पोलिसांवर राजकीय दबाव असल्याचा आरोप वारंवार होत आहे. त्यातच कोर्टाकडूनही पोलिसांना फटकारले जात असल्यामुळे पोलिसांच्या प्रतिमेला धक्का बसल्याचे बोलले जात आहे.

## मुसळधार पाऊस अन् वादळी वाऱ्याचे मोहा परिसरात थैमान

### अनेकांच्या घरांचे पत्रे उडाले; झाडे व विद्युत खांब कोसळले

आरंभ मराठी । मोहा

सोमवारी सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास कळंब तालुक्यातील मोहा व परिसरात अचानक आलेल्या मुसळधार पावसासह वादळी वाऱ्यांनी प्रचंड थैमान घातले. काही मिनिटांच्या झंझावाती पावसाने संपूर्ण परिसरात धुमाकूळ घातला. यामध्ये अनेक घरांची पत्र्याची छप्पर उडाले, झाडे कोसळली, विद्युत खांब आणि तारा तुटून वीजपुरवठा खंडित झाला असून फळभाजी व इतर पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, संध्याकाळी अचानक वातावरण बदलले आणि मुसळधार पावसासह जोरदार वारे वाहू लागले. वाऱ्याचा वेग एवढा जबरदस्त होता की अनेक घरांचे पत्रे उडून गेले. काही घरांचे छप्पर तर शेतामध्ये जाऊन पडले. वादळामुळे गावात अनेक झाडे मुळासकट उन्मळून पडली आहेत. काही झाडे रस्त्यावर कोसळल्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला. याशिवाय अनेक ठिकाणी झाडे घरांवर, वीज वाहिन्यांवर व विद्युत खांबांवर कोसळल्याने नुकसान अधिकच वाढले आहे. काही ठिकाणी वीज खांब कोसळून तारा जमिनीवर



आल्याने नागरिकांना धोका निर्माण झाला होता. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी तातडीने पोहोचून वीजपुरवठा सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. मात्र मोठ्या प्रमाणावर झालेल्या नुकसानीमुळे वीज सेवा पूर्ववत होण्यासाठी वेळ लागणार असल्याचे सांगण्यात येत आहे. या वादळाचा फटका शेती क्षेत्रालाही बसला. विशेषतः टोमॅटो, मिरची, वांगी व इतर फळभाजी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. काही ठिकाणी पिके वाऱ्यामुळे आडवी झाली असून झाडांवरून फळे झाडून पडली आहेत. शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

## कृष्णा नदीचे १६.६६ टीएमसी पाणी मराठवाड्यात वळवण्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न सुरू

- मित्र'चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची पत्रकार परिषदेत माहिती
- जिल्ह्यातील ८५००० हेक्टर जमीन ओलिताखाली येणार

आरंभ मराठी | धाराशिव

कृष्णा–मराठवाडा सिंचन प्रकल्पाचे काम एकीकडे युद्धपातळीवर सुरू असताना, कृष्णा नदीचे १६.६६ टीएमसी पाणी मराठवाड्याकडे वळण्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न सुरू असल्याची माहिती 'मित्र'चे उपाध्यक्ष आमदार राणा पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी,सिंचन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

कृष्णेचे अतिरिक्त १६.६६ टीएमसी पाणी वळवण्यात यश आल्यास ८५००० हेक्टर जमीन ओलिताखाली येणार असल्याचे त्यांनी सांगितले. हे पाणी आपल्याकडे वळवण्यासाठी बऱ्याच वर्षांचा कालावधी लागणार असला तरी सध्या प्रशासकीय बैठकीतून या विषयावर काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. कृष्णा पाणी तंटा लवाद–१ नुसार ५९९ टीएमसी पाणी महाराष्ट्राला देण्याचे ठरले होते. परंतु, गेल्या काही वर्षांचा अभ्यास केला असता, पाऊस काळ चांगला असतो तेंव्हा केवळ ५२० टीएमसी पाणी राज्यात वापरले जाते. उरलेले पाणी राज्यातून पुढे जाते. राज्यात काही प्रकल्प कार्यान्वित होणार आहेत. ते प्रकल्प कार्यान्वित झाले तरी जास्तीत जास्त ५६० टीएमसी पाणी राज्यात थांबवता येऊ शकेल. तरीदेखील ३९ टीएमसी पाणी उपलब्ध होऊ शकते असा निष्कर्ष काढला आहे. हे पाणी मराठवाड्यात कसे आणता येईल याचा अभ्यास सुरू करण्यात आल्याचे आमदार राणा पाटील यांनी सांगितले. हे पाणी मराठवाड्याकडे वळवता येईल हे कागदोपत्री आणि प्राथमिक अभ्यासाअंती स्पष्ट झाले आहे. कृष्णा पाणी तंटा लवाद–१ मध्ये पाणी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यास संमती आहे. परंतु,कृष्णा पाणी तंटा लवाद–२ मध्ये पाणी नेण्यास मनाई करण्यात आलेली आहे. त्यामुळे हे १६.६६ टीएमसी पाणी आपल्याकडे आणण्यासाठी तीव्र हालचाली करणे आवश्यक आहे. त्याचाच भाग म्हणून मागील आठवड्यात त्याची प्राथमिक बैठक पुणे येथे कृष्णा खोरे ऑफिसला घेतल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले. यासंबधी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासोबत देखील लवकरच बैठक घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्या बैठकीत मित्र चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविणसिंह परदेशी, जलसंपदा विभागाचे सचिव उपस्थित राहतील, या बैठकीतून काहीतरी सकारात्मक घडेल आणि १६.६६ टीएमसी पाण्याचा प्रश्न सुटेल अशी अपेक्षा आमदार राणा पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

### कृष्णा–मराठवाडा सिंचन प्रकल्पाचे पाणी येण्यास उशीर होणार



कृष्णा–मराठवाडा सिंचन प्रकल्पाचे पाणी ऑगस्ट महिन्यात तुळजापूर येथील रामदरा तलावात येईल असे प्रयत्न सुरू होते. परंतु, मान्सूनपूर्व पावसामुळे सुरू असलेल्या कामामध्ये व्यत्यय निर्माण झाला. त्यामुळे हे पाणी ऑगस्ट मध्ये येण्याची शक्यता मावळली आहे. पाणी नेमके कधी येणार याचे थेट उत्तर देण्याचे आमदार राणा पाटील यांनी टाळले असले तरी या पाण्याला आता आणखी उशीर होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. यावर्षी कसल्याही परिस्थितीत पाणी आणण्याचा निर्धार पाटील यांनी बोलून दाखवला.

### राज्यमंत्री दर्जावरून ओमराजेंवर टीका

'मित्र' च्या उपाध्यक्षांना राज्यमंत्र्यांचा दर्जा नसल्याबाबत खासदार ओमराजे यांनी केलेल्या टिकेला पाटील यांनी बाष्कळ चर्चेला महत्व देत नसल्याचे सांगितले. मी सकारात्मक काम करण्यासाठी या पदावर असून, लोकांचे जीवनमान कसे सुधारेल याचा मी विचार करतो असे पाटील म्हणाले. पत्रकारांनी देखील नको त्या गोष्टीला आणि व्यक्तीला महत्व न देण्याचा सल्ला त्यांनी दिला.

### तुळजाभवानीचा लाडू प्रसाद हाताने बनवलेलाच हवा

तुळजाभवानी देवीच्या लाडू प्रसादाचे टेंडर चितळे बंधू यांना देण्यात आले आहे. हा प्रसादाचा लाडू तिरुपती आणि शिर्डी प्रमाणे हातानेच बनलेला हवा, तसेच लाडू बनवण्यासाठी तुळजापूर येथील महिलांना रोजगार मिळायला हवा असे आमदार पाटील म्हणाले.

धाराशिवला मिळणाऱ्या २३.६६ टीएमसी पाण्याची प्रशासकीय मान्यता २००९ मध्ये मिळाली होती. २०२२ मध्ये तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुधारित प्रशासकीय मान्यता दिली होती. त्या माध्यमातून सध्या ७ टीएमसी ची कामे हाती घेतलेली आहेत. उरलेले १६.६६ टीएमसी पाणी हेदेखील धाराशिवच्या हक्काचे पाणी आहे. या पाण्यामुळे ८५००० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असल्याचे पाटील यावेळी म्हणाले.

## पॉलिसीचा हप्ता भरतो म्हणत २५ हजारांची आर्थिक फसवणूक

आरंभ मराठी | धाराशिव

पॉलिसीचा हप्ता भरतो म्हणून घेतलेल्या पैशाने पॉलिसीचा हप्ता न भरता आर्थिक फसवणूक केल्याची घटना धाराशिव शहरात उघडकीस आली. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी किरण पाचपोर (रा. श्रीराम लाईफ इन्शुरन्स कंपनी शाखा धाराशिव) यांनी दिनांक ८ नोव्हेंबर २०२४ रोजी श्रीराम लाईफ इन्शुरन्स कंपनी शाखा धाराशिव येथे फिर्यादी निर्मजा बस्वेश्वर नगरे (वय ४८ वर्षे, रा. समर्थनगर धाराशिव) यांना आरोपीने विश्वासात घेवून पॉलीसीचा हप्ता भरणा करून घेतो असे सांगून त्यांच्याकडून पैसे घेतले. परंतु, सध्या कंपनीचे सर्व्हर डाउन आहे असे म्हणून फिर्यादीकडून त्यांनी ४५,००० रुपये घेतले. त्यांनी कच्च्या पावतीवर भरणा केल्याचे लिहून सही करुन फिर्यादी यांना देवून विश्वासाने घेतलेली रक्कम भरली नाही. फिर्यादीने रक्कमे बाबत विचारणा केली असता त्यातील १९,००० रुपये फिर्यादीस परत करुन उर्वरीत रक्कम २६,००० रुपये न भरता फिर्यादीची फसवणुक केली. याप्रकरणी निर्मला नगरे यांनी दिनांक ८ जून रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३१६(५), ३१८(४) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## वाहतूक शाखेकडून सव्वा तीन लाख रुपये दंड वसूल

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दिनांक ८ जून रोजी मोटार वाहन कायदा- नियम भंग प्रकरणी एकुण ३७० कारवाया करून ३,२४,००० रुपये 'तडजोड शुल्क'वसुल केले. दुचाकीवर तीन व्यक्ती बसवून दुचाकी चालवणे, गाडीची कागदपत्रे जवळ न बाळगणे, गाडीची नंबरप्लेट चुकीची असणे याबद्दल वाहतूक पोलिसांनी या कारवाया केल्या आहेत.

CMYK

# प्रत्येकात असतो एक नेता!

'प्रत्येक व्यक्ती हा नेता असतो.'माझे हे वाक्य काही जणांना अतिशयोक्ती वाटेल. परंतु नेता म्हणजे फक्त राजकीय पुढारी नव्हे. प्रत्येक व्यक्ती त्याच्या पातळीवर नेतृत्व करत असतो.खेळाच्या संघाचा 'कर्णधार' हा त्या संघाचा नेता असतो. लष्करात सैन्याच्या तुकडीचा प्रमुख हा त्या सैन्याचा नेता असतो. वर्गामध्ये शिक्षक हा विद्यार्थ्यांचा नेता असतो. मुख्याध्यापक शाळेतील सर्व शिक्षकांचा नेता असतो. एखाद्या कंपनीतील मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) हा त्या कंपनीतील सर्व कर्मचाऱ्यांचा नेता असतो. इतकेच नव्हे तर कुटुंबप्रमुख हा त्या कुटुंबाचा नेता असतो. प्रत्येकाला आयुष्यात नेतृत्व करण्याची संधी मिळते. नेतृत्व करणे हे जबाबदारीचे काम असते, कारण नेत्याच्या चुकीमुळे त्याच्या अधीन असणाऱ्या सर्व घटकांना त्याचे परिणाम भोगावे लागतात.



## मग,नेता कसा असावा?

या विषयावर अनेक विद्वान, तत्त्ववेत्ते, संत-महात्म्यांनी आपले विचार मांडले आहेत. त्यांचा सारांश असा करता येईल की, नि:स्वार्थीपणा, दूरदृष्टी, ऐकण्याची वृत्ती, जबाबदारी, प्रेरणादायी स्वभाव, न्यायनिष्ठा, कणखरपणा आणि उदारमतवाद हे गुण नेत्यामध्ये असावेत. असे गुण असलेला नेता स्वत:सह इतरांनाही पुढे घेऊन जातो.

नेता तयार होतो कसा?
नेतृत्व मिळवण्याचे चार मार्ग आहेत:
१) कठीण काळात इतरांना सावरणारा व्यक्ती नेता बनतो.
२) विशेष गुण आणि क्षमता असलेल्या व्यक्तीला नेतृत्व बहाल केले जाते.
३) विशिष्ट कामात पारंगत असलेल्या व्यक्तीला त्या कामासाठी नेतेपद दिले जाते.
४) सकारात्मक दृष्टिकोन असलेल्या व्यक्तीला नेतृत्व दिले जाते.

## नेतृत्वाची गरज का?

ज्याप्रमाणे जहाजाचा कॅप्टन ते जहाज वादळांमधून पार नेतो, त्याचप्रमाणे समूहासाठी नेता आवश्यक असतो. जहाज भरकटल्यास त्याची जबाबदारी कॅप्टनवर येते, तशीच समूह भरकटल्यास त्याची जबाबदारी नेत्यावर असते.
अँथनीटी दादवानो याने म्हटले आहे, ''चांगले नेतृत्व फक्त चांगल्या गोष्टी करत नाही, तर त्या अधिक चांगल्या प्रकारे कशा करता येतील, हे शोधते.''
विन्स लोंबार्डी म्हणतात, ''नेतृत्व हे जन्मतः मिळत नाही, ते घडवावे लागते.''
मी माझ्यात नेतृत्व गुण कसे आणू?
१) आदर्श कृती करा. फक्त तोंडी उपदेश करणारा नेता बनत नाही. महान नेता तोच असतो जो स्वतः कृती करतो आणि लोक त्याचे अनुकरण करतात.
२) ध्येय निश्चित ठेवा. नेत्याचे ध्येय स्पष्ट असावे आणि त्या दिशेने कृती ठरवलेली असावी.
३) निर्णयक्षमता विकसित करा. महान नेता स्वत:चे निर्णय स्वतः घेतो.
४) भीतीवर मात करा. अपयशाची, टीकेची, जोखमीची किंवा संवादाची भीती बाळगू नका. 'ज्याची भीती वाटते ते काम पहिल्यांदा करा,' असे म्हणतात.
५) प्रेरणादायी बना. आपल्या समूहाचे जीवनमान सुधारण्यासाठी धडपडा. त्यांच्याशी संवाद साधा, त्यांच्या ताकदी व मर्यादा ओळखा आणि त्यांच्या विकासासाठी काम करा.

'''महान नेता इतर नेत्यांची निर्मिती करतो.''

तो आपले नेतृत्व कुणावरही लादत नाही, तर लोक त्याच्या कार्यातून प्रेरित होतात.
''जसा राजा, तशी प्रजा'' या उक्तीप्रमाणे समूह नेत्याच्या वर्तनाचे अनुकरण करत असतो. म्हणून नेत्याच्या कृती आदर्श असाव्यात.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''नेता हा समाजाचा खराखुरा मार्गदर्शक असावा. तो स्वार्थी नसावा. दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणारा, भाडोत्री काम करणारा किंवा दिशाभूल करणारा नसावा.''
नेता होण्यासाठी काही गुण प्रत्येकात आधीपासून असतात, काही गुण प्रयत्नाने विकसित करावे लागतात. कोणीही जन्मत:च नेता नसतो. जसजसे हे गुण विकसित होत जातील तसतसं आपलं नेतृत्व विस्तारत जातं. '' प्रत्येकात असतो एक नेता!'' हे १०० / खरं आहे. पडताळून पहा, मग समजेल..



किशोर
जाधव,सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# बियाणे खरेदी करताना अशी घ्या काळजी

शेतकरी बांधवांनी बियाणे खरेदी करताना कोणत्याही जाहिरातींवर किंवा विक्रेत्याच्या आश्वासनांवर अवाजवी विश्वास ठेवू नये. बियाण्याची खरेदी ही अभ्यासपूर्वक आणि योग्य माहिती घेऊनच करावी. निवडलेला वाण आपल्या भागासाठी शिफारस केलेला आहे का, तो कोणत्या किडी-रोगासाठी प्रतिकारक्षम आहे का, त्याचा वाढीचा कालावधी, हवामान, जमिनीचा प्रकार, लागवडीचे अंतर आदी बाबींचा विचार व्हावा. खासगी कंपन्यांच्या बियाण्यांमध्ये अधिक उत्पादनाचे प्रलोभन देण्यात येते, मात्र अशा अपरिचित वाणांची निवड केल्यास फसवणुकीस सामोरे जावे लागू शकते, तसेच त्यातून नवीन रोग-किडींचा प्रसार होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे वाणाची निवड करताना तज्ज्ञांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे. बियाणे खरेदी करताना बियाण्याची पिशवी प्रमाणित (सर्टिफाईड) आहे का, याची खात्री करून घ्यावी. प्रमाणित पिशवी ही तिन्ही बाजूंनी शिवलेली असते, वरच्या बाजूस सील व प्रमाणपत्र असते. प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये उपलब्ध बियाण्यांवरही आवश्यक माहिती पिकाचे नाव, वाण, उगवणशक्ती, बियाण्याची शुद्धता, चाचणी तारीख, वापरलेले रसायन छापलेली असते. बियाणे खरेदी करताना लेबलवरील ही सर्व माहिती तपासून घ्यावी. खरेदी करताना पक्की पावती घ्यावी, ज्यावर शेतकऱ्याचे नाव, पत्ता, तारीख, विक्रेत्याची सही इत्यादी तपशील असावेत. बियाण्याच्या पिशवीवरील छापलेल्या किमतीपेक्षा जास्त रक्कम देऊ नये; अधिक दर मागितल्यास वजनमापे निरीक्षकांकडे तक्रार करता येते.

पेरणीनंतर बियाण्याची रिकामी पिशवी, त्यावरील टॅग आणि खरेदीचे बिल जपून ठेवावे. उगमशक्ती कमी झाली, तर ही कागदपत्रे पुरावा म्हणून उपयोगी पडतात. बियाणे खालच्या बाजूने फोडल्यास त्यावरील टॅग सुरक्षित राहतो. तसेच, मुदतबाह्य किंवा आधीच उघडलेले बियाणे खरेदी करू नये. दरवर्षी सरळ वाणाचे नवीन बियाणे घेणे टाळावे; एकदा घेतलेले चांगले बियाणे योग्य साठवणुकीसह तीन ते चार वर्षे वापरता येते. वजनाबाबत शंका असल्यास बियाण्याचे वजन करून घ्यावे. योग्य बियाण्याची निवड ही उत्पादन वाढवण्यासोबतच खर्चही नियंत्रित ठेवते. त्यामुळे शेतकऱ्यांनी सावध आणि माहितीपूर्ण निर्णय घेतल्यास शेती अधिक लाभदायक होऊ शकते.



बालाजी देशमुख,
सहायक कृषी अधिकारी,
कळंब.

# आपत्ती व्यवस्थापन गरजेचे

बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा जीव गेला आणि ३३ जण गंभीर जखमी झाले. यापूर्वी प्रयागराज येथे महाकुंभ मेळाव्यात अनेकांचा जीव गेला. क्षमतेपेक्षा जास्त लोक येणार असतील तर केवळ पोलीस प्रशासन एकटे पुरे पडणार नाहीत, तर अशा ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन कक्ष असणे आवश्यक आहे. आपत्ती व्यवस्थापनातील कर्मचारी हे प्रशिक्षित असतात. अशी परिस्थिती हाताळणे त्यांना सोप्पी जाते. आयपीएल मधील आरसीबीचा विजयाचा आनंदोत्सव साजरा होत असताना स्टेडियम क्षमता ३५ हजार असताना नागरीक २ लाखाहून अधिक आले. स्टेडीयम मध्ये मोफत प्रवेश सुरू झाल्याच्या अफवेने प्रंचड गोंधळ उडाला. पोलीसांना परिस्थिती आटोक्यात आणणे शक्य नसल्याने चेंगराचेंगरी सुरू झाली. त्यात ११ जणांनी आपला जीव गमावला. अशीच परिस्थिती धार्मिक उत्सव, सभा, क्रिडा महोत्सव, यात्रा, जत्रामध्ये निर्माण होते. अशी परिस्थिती आटोक्यात आणणे कठीण असते. नैसर्गिक अथवा मानव निर्मित आपत्ती येणार असेल तर त्याठिकाणी आपत्ती व्यवस्थापन कक्ष सज्ज असणे अवश्य आहे. त्यात पोलीस, अग्निशमन, सुसज्ज रुग्णवाहिका, वैद्यकीय



सेवा, दंगल परिस्थिती बाबत राखीव सुरक्षा दल अशा यंत्रणा सज्ज असल्या पाहिजेत. सध्या पावसाळा जोरदार सुरु असून अतिवृष्टी, पूर, दरड कोसळणे, अपघात याशिवाय औद्योगिक अपघात, अतिरेकी असे प्रकार घडत असतात. शासनाने अशा स्थितीची पाहणी व नागरिकांना सावधगिरीचा सूचना देणे आवश्यक आहे. देशात अशा परिस्थिती वारंवार निर्माण होत असतात. अनेकदा सरकार अपयशी ठरते. नागरिकांचा जीव अमूल्य आहे. त्यांना संरक्षण देणे सरकारची जबाबदारी आहे. मुख्यमंत्री ते गावपातळीवरील प्रशासनाचा कार्यरत घटक हे आपत्ती कालखंडात जबाबदार असतात. पुर्वसुचना व परिस्थिती पाहून नियोजन शक्य होते. राष्ट्रीय एकात्मता व सुरक्षितता देशातील व्यक्ती आणि संस्थेचे मूलभूत कर्तव्य असल्यामुळे साहजिकच आपत्ती निवारण्याची जबाबदारी सरकार आणि प्रत्येक नागरीकाची आहे.



विठ्ठल वळसे-पाटील
निरगुडसर,पुणे
मो. ९४९४०६६०४२
vithalvalse@gmail.com

## पेरणी

मृग नक्षत्राचा आरंभ होता
काळ्या ढगांची गर्दी आकाशात
वारा थांबतो,उकाडा वाढतो
सायंकाळी पाऊस पडतो
सरीवर सरी कोसळतात
पाणीच पाणी पसरवतात
ओल्या मातीचा सुगंध दरवळतो
रोम रोम पुलकित होतो
शेतकऱ्यांना पेरणीची घाई
तिफणीला तासून घेई
खत बियाणांची खरेदी
पुरेशा माणसांची जोडणी
धो धो पाऊस बरसतो
मातीत पाणी जिरवतो
सकाळी शेतकरी शेतात
पेरणीची तयारी जोरात
शिवार माणसांनी फुलतो
पेरत्या व्हा शीळ ऐकतो
शेतकरी चाड्यावर मूठ धरतो
खत बियाणे मातीत पेरतो
सगळ्या शिवारात पेरणी चाले
उनाड वारा हळूच शीळ घाले
पेरणी सुंदर उत्सव शेतीचा
माणसांत माणुसकी पेरण्याचा

बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.
मो.९५४५४४२६४८.

# जिल्हा परिषदेतर्फे गुरुवारी पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबीर व कार्यशाळेचे आयोजन

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्हा परिषद, धाराशिवच्या वतीने जिल्ह्यातील सर्व पत्रकारांसाठी एकदिवसीय आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. विविध उपक्रम तसेच शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन दिनांक १२ जून रोजी स्थायी समिती सभागृह, जिल्हा परिषद, धाराशिव येथे करण्यात आले आहे.या कार्यक्रमात सकाळी १० वाजता पत्रकारांची नाव नोंदणी होईल. त्यानंतर १०.३० वाजता प्रास्ताविक सत्र होईल. सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ.राठोड व डॉ. रवी चव्हाण हे पत्रकारांची आरोग्य तपासणी करतील. दुपारी १ ते २ या वेळेत जिल्हा परिषदेच्या विविध विभाग प्रमुखांकडून विविध शासकीय योजना व उपक्रमांची माहिती देणार आहे. त्यानंतर २ ते २.३० या वेळेत अल्पोहार व समारोप सत्र होईल. या आरोग्य तपासणी शिबीर व कार्यशाळेस जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांनी केले आहे.

# कांदाचाळीसाठी अनुदानाचा लाभ घेण्याचे आवाहन

आरंभ मराठी | धाराशिव

राज्यात कांदा उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असले तरी त्याच्या साठवणुकीअभावी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. त्यामुळे कांद्याची सड, वजन घट व गुणवत्तेत बिघाड होतो. हे लक्षात घेता एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत सन २०२५-२६ मध्ये कमी खर्चाचे कांदाचाळ साठवणूक गृह या घटकाचे प्रकल्प राबवण्यात येणार आहेत. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ५ ते १ हजार मे.टन क्षमतेच्या साठवणूक गृह उभारणीसाठी शास्त्रशुद्ध सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, प्रकल्प खर्च ३० लक्ष रुपयांपेक्षा जास्त असल्यास बँक कर्ज आवश्यक राहील.या योजनेत 'क्रेडिट लिंक्ड बॅक एंडेड सबसिडी' स्वरुपात अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत खर्च मर्यादा ७,००० रुपये प्रति मे.टन असून, अनुदानाची रचना क्षमतेनुसार खालीलप्रमाणे आहे :-२५ मे.टन ₹१०,००० प्रति मे.टन (५०% अनुदान).२५-५०० मे.टन ८,००० रुपये प्रति मे.टन, ५००-१००० मे.टन ६,००० रुपये प्रति मे.टन.या योजनेचा लाभ वैयक्तिक कांदा उत्पादक शेतकरी,शेतकऱ्यांचे गट, स्वयंसहायता गट,महिला गट, एफपीओ,नोंदणीकृत शेती संस्था व सहकारी संस्था घेऊ शकतात.*लाभार्थी पात्रता निकष :* अर्जदाराकडे स्वतःच्या मालकीची जमीन असावी व ७/१२ उताऱ्यावर कांदा पिकाची नोंद असावी.अर्ज करताना शेतकऱ्याकडे प्रत्यक्ष कांदा पीक असणे बंधनकारक आहे.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी रविंद्र माने यांनी दिलेल्या माहितीनुसार, कांदा साठवणुकीसाठी आधुनिक पद्धतीने उभारण्यात आलेल्या चाळीमुळे उत्पादनाची गुणवत्ता टिकून राहते आणि शेतकऱ्यांना अधिक नफा मिळतो. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवर :/ https://mahadbt.maharashtra.gov.in/... या संकेतस्थळावर 'फलोत्पादन' या घटकाखाली अर्ज करावा.अधिक माहितीसाठी संबंधित कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा,असेही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.

# तुळजापूर शहरातील हुतात्मा स्मारक ते किसान चौक रस्ता रुंदीकरणाचा मार्ग मोकळा

## महाविकास आघाडीच्या आंदोलनाला यश,ऋषीकेश मगर यांची प्रतिक्रिया

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर शहरातील बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असलेला हुतात्मा स्मारक ते आर्य चौक, किसान चौक हा रस्ता रुंदीकरणाचा मार्ग आता मोकळा झाला आहे. या रस्त्याच्या रुंदीकरणास शासनाने मंजुरी दिलेली आहे. या रस्त्याच्या मंजुरीसाठी मागील काही वर्षापासून महाविकास आघाडीच्या माध्यमातून आंदोलने करण्यात आली या आंदोलनाला यश आले आहे. रस्ता रुंदीकरणाचा बऱ्याच वर्षापासूनचा प्रलंबित प्रश्न त्या भागातील जेष्ठ नागरिक, व्यापारी यांच्या आंदोलने व महाविकास आघाडीने घेतलेला पुढाकार यामुळे शासनाला या रस्ता रुंदी करणास मंजुरी देण्यास भाग पाडल्याचे ऋषिकेश मगर यांनी सांगितले. माजी पालक मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी हा रस्ता प्राधिकरण आराखड्यात समाविष्ट करून मंजूर केला होता. कारण हा रस्ता भवानी रोडला समांतर आहे व नवरात्रामध्ये गर्दी झाल्यास या रस्त्याचा उपयोग होणार असल्यामुळे रस्ता रुंदीकरण होणे गरजेचे होते. परंतु या रस्ता रुंदीकरणास मंजुरी मिळण्यास विलंब लागत होता आता या रस्ता रुंदी कारणास मंजुरी मिळाली आहे. स्थानिक नागरिक, व्यापारी यांनी अनेक वेळा खासदारांकडे या रस्त्याच्या मंजुरीसाठी निवेदन दिली होती. अखेर त्यांच्या माध्यमातून हा विषय मार्गी लागलेला आहे. मागील काही काळात यासाठी स्थानिक नागरिक व्यापारी यांनी व महाविकास आघाडीचे प्रमुख कार्यकर्ते यांनी अर्धनग्न आंदोलन ही केले होते. जिल्ह्याचे खासदार ओमराजे निंबाळकर व महाविकास आघाडीचे सर्व प्रमुख कार्यकर्ते तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक तसेच माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांचे महाविकास आघाडीच्या वतीने आम्ही आभारी असल्याचे रुषीकेश मगर यांनी सांगितले.

# खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांचा धाराशिव जिल्हा शिवसेनेच्या वतीने सत्कार

आरंभ मराठी | धाराशिव

पाकिस्तान्यांनी पेहेलगाम येथे पर्यटकांवर केलेल्या हल्ल्यानंतर भारत देशाने ऑपरेशन सिंदुर मोहीम राबवून दहशतवाद्यांना नामोहरम केले. ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर खासदार डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी भारताने पाकिस्तानवर केलेल्या कारवाईबाबत देशाची बाजू जगभरातील विविध देशात जाऊन मांडली. तसेच पाकिस्तानबाबतही विविध देशाच्या प्रतिनिधींची मते जाणून घेतली. या दौऱ्यावरुन परतल्यानंतर धाराशिव जिल्ह्याच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज राजाभाऊ साळुंके यांनी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांचा सत्कार केला. ऑपरेशन सिंदुरच्या यशानंतर जागतिक पातळीवर खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्त्वाखालील खासदारांच्या शिष्टमंडळाने विविध देशाचा दौरा केला. या दौऱ्यात जागतिक स्तरावर खा.डॉ. शिंदे यांनी भारताची भूमिका भक्कमपणे मांडली. युएई, लायबेरिया, कांगो, सिएरा अशा विविध देशांमध्ये त्यांनी ऑपरेशन सिंदुरबाबत मते जाणून घेत पाकिस्तानच्या कुटील धोरणाबाबतही त्यांनी चर्चा केली. अनेक देशांनी दहशतवादाला पोसणाऱ्या पाकिस्तानबाबत नकारात्मक वक्तव्य केल्याचे खासदारांच्या शिष्टमंडळाला दिसून आले. अनेक देशांनी भारताच्या दहशतवादाविरोधातील भूमिकेचे समर्थन केले.दौरा यशस्वीपणे पार पडल्यानंतर खा.डॉ.श्रीकांत शिंदे हे भारतात परतले असता त्यांच्या ठाणे येथील निवासस्थानी धाराशिव जिल्हा शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच त्यांची ही भूमिका शिवसैनिकांसाठी अभिमानास्पद असल्याचे सांगत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी युवासेना शहरप्रमुख सागर कदम,आकाश कोकाटे यांच्यासह धाराशिव जिल्हा शिवसेनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.



# कळंब बस स्थानकात अग्रवाल कुटुंबाकडून पाणपोई




कळंब- येथील बस स्थानकात कळंब शहरातील प्रतिष्ठित व्यापारी स्वर्गीय कैलास अग्रवाल यांच्या स्मरणार्थ त्यांच्या परिवाराकडून स्वखर्चाने उभारलेल्या अत्याधुनिक पाणपोईचा लोकार्पण सोहळा कळंब धाराशिव विधानसभा मतदारसंघाचे आमदार कैलास पाटील यांच्या हस्ते रविवार ( ता.८) रोजी करण्यात आला. कळंब बसस्थानकात स्वखर्चातून उभा करण्यात आलेल्या अत्याधुनिक पाणपोईची व्यवस्था अग्रवाल परिवाराकडून करण्यात आली आहे. जवळपास सहा लाख रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या आणि प्रवाशांना आरोग्यवर्धक स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणाऱ्या या पाणपोईचा लोकार्पण सोहळा आमदार कैलास पाटील यांच्याहस्ते करण्यात आला. याप्रसंगी अग्रवाल परिवारातर्फे श्रीमती रेखाताई अग्रवाल, कल्पेश अग्रवाल, कार्तिक अग्रवाल, कविता अग्रवाल, योगेश अग्रवाल, विभागीय वाहतूक अधिकारी अभय देशमुख, कार्यक्रमाचे अध्यक्ष कळंब आगार प्रमुख एस.डी. खताळ, दिलीप पाटील, मोहन जाधव, प्रदीप मेटे, प्रभाकर झांबरे, दत्ता मुंडे, वाहतूक नियंत्रक हनुमंत मुंडे, करसन पटेल, संजय देवडा, अमोल वाघचौरे, शिवाजी निळे, विष्णू कोल्हे, राजाभाऊ देशमाने, डॉ.श्याम चौधरी, ठेकेदार टेकाळे आदी उपस्थित होते.

## कोरोना काळापासून आजपर्यंत अग्रवाल कुटुंबाची मदत

कोरोना काळातही अग्रवाल परिवारातर्फे बाजाराम ध्ये जवळपास तीन लाख रुपये किमतीची असलेली ऑक्सीजन कन्सिडर मशीन कळंबच्या नागरिकांसाठी रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी मार्फत मोफत दिली होती. कोरोनाची सद्य परिस्थिती पाहता त्यांनी पुन्हा आजच्या या कार्यक्रमात आणखी एक मशीन कळंबकरांसाठी उपलब्ध करून दिली आहे. त्यांच्या या योगदानाबद्दल आमदार कैलास पाटील यांनी आभार मानले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

# कॉम्रेड सागर व कॉम्रेड प्रीती धुमुरे दाम्पत्याचा प्रेरणादायी प्रवास

# आंतरजातीय विवाह,संघर्ष ते यशस्वी व्यवसाय

मोहन जाधव | मुरूम

**सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन (AISF) संघटनेचे मुरुम शहराध्यक्ष सागर धुमुरे यांनी तीन वर्षांपूर्वी ६ जून २०२२ रोजी प्रीती यांच्याशी आंतरजातीय विवाह केला होता. या विवाहामुळे सुरुवातीला दोन्ही कुटुंबांत नाराजीची भावना होती. प्रीती यांच्या कुटुंबीयांना एका पाण्याचे जार विकणाऱ्या तरुणाकडून आपल्या मुलीचे भविष्य सुरक्षित राहील का, अशी शंका वाटली होती. मात्र सागर यांच्या संघर्षमय जीवनाने आणि प्रीतीच्या जिद्दीने आज त्यांनी यशस्वी व्यवसाय उभा करून सर्व समाजासमोर आदर्श उदाहरण सादर केले आहे.**

## खासदार,आमदारांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम





शनिवारी (ता. ७ जून) मुरुम शहरात भव्य दिव्य अशा पद्धतीने ''एस. पी. मेडिकल अँड जनरल स्टोअर्स'' या दुकानाचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी शहीद भगतसिंग, महात्मा बसवण्णा, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी कॉँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून धाराशिवचे खासदार ओम राजे निंबाळकर, उमरगा-लोहरा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी, कॉँग्रेस प्रदेश सरचिटणीस अमर खानापुरे, मुरुम पोलीस ठाण्याचे पीएसआय ज्ञानेश्वर गव्हाणे, चे माजी राज्याध्यक्ष पंकज चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार रफिक पटेल, माजी नगरसेवक बालाजी पाटील, चंद्रशेखर मुदकन्ना, श्रीकांत मिनीयार, अजित चौधरी, डॉ. विजयानंद बिराजदार, मराठा सेवा संघाचे संजय सावंत, श्रीधर इंगळे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.या कार्यक्रमात आमदार, खासदार आणि मान्यवरांनी धुमुरे दाम्पत्याच्या संघर्षाचे कौतुक करत त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. यावेळी श्रीकांत मिनियार, पंकज चव्हाण, अमर खानापुरे व आमदार प्रवीण स्वामी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''संघर्षाची बीजे सामाजिक कार्यातून रुजतात आणि त्यातूनच असे प्रेरणादायी उद्यमशील तरुण पुढे येतात. अशा तरुणांकडे लोकप्रतिनिधींचे विशेष लक्ष असणे गरजेचे आहे व त्यांना सहकार्य देखील करणे अपेक्षित आहे, कारण समाजपरिवर्तनासाठी रस्त्यावर उतरलेली ही मुले व्यवसायातही ठसा उमटवत आहेत. तसेच हा कार्यक्रम म्हणजे आंतरजातीयतेवरचा समाजाचा विश्वास पुन्हा बळकट करणारा क्षण आहे. त्यांच्या या प्रवासासाठी हार्दिक शुभेच्छा. याशिवाय खासदार ओमराजे निंबाळकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले, ''सागर व प्रीती यांनी दाखवलेला धैर्याचा आणि यशाचा मार्ग हा आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. मी जिथे जाईन तिथे यांचे उदाहरण नक्की देईन.'अध्यक्षीय समारोप करताना सुरेश बिराजदार यांनी आपल्या भाषणात मिश्किल शैलीत मार्गदर्शन करत सांगितले की, ''सामाजिक चळवळीतील ही मुले महापुरुषांच्या विचारांनी भारलेली आहेत. त्यांचे कष्ट, चिकाटी आणि आदर्श जीवनशैली हे आजच्या तरुण पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. ही तरुण मंडळी फक्त दुकान उघडत नाहीत, तर महापुरुषांच्या विचारांची झळाळती झलक समाजात निर्माण करत आहेत. संघर्ष हीच खरी संपत्ती आहे आणि सागर-प्रीती यांनी त्याचं मूर्तिमंत उदाहरण उभं केलं आहे.या कार्यक्रमासाठी आकाश च्यारे, रुद्रा मुळे, प्रतीक भोंडवे , समर्थ अंबुरे, संदीप कदम, बसवराज पणाळे, आकाश शिरोळे, रणजित शिरोळे, आदित्य फनेपुरे, चंद्रकांत गुत्तेदार, निलेश सरसंबे, समीर शेख, राहुल सराटे, मल्लिनाथ काळे, जगदीश राठोड, अमर वाकळे, प्रकाश फनेपुरे, गुरु तेलीखूने, कपिल देडे आदी तरुणांनी परिश्रम घेतले.

### एक प्रेरणादायी मार्ग

या संपूर्ण कार्यक्रमाने हे अधोरेखित केले की, सामाजिक चळवळीत कार्यरत तरुण जर आत्मविश्वास, जिद्द व मेहनतीच्या जोरावर पुढे गेले, तर समाज कोणत्याही जातीधर्माच्या पलीकडे जाऊन त्यांना स्वीकारतो. सागर व प्रीती धुमुरे यांचा संघर्ष आणि यशस्वी वाटचाल ही हजारो तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

कॉम्रेड लखन भोंडवे (जिल्हाध्यक्ष)
ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन, धाराशिव

कार्यक्रमाचे प्रास्ताविक लखन भोंडवे यांनी केले, तर सूत्रसंचालन मोहन जाधव यांनी समर्थपणे पार पाडले आणि आभार महेश धुमुरे यांनी मानले. सागर धुमुरे यांनी आपल्या कष्टातून प्रीतीला फार्मसी शिक्षण दिले. प्रीती यांनीही तेवढ्याच जिद्दीने व प्रबळ इच्छाशक्ती दाखवत शिक्षण पूर्ण करून पदवी प्राप्त केली. त्यांच्या सामूहिक कष्टातून आज त्यांनी मेडिकल व्यवसाय सुरू केला असून समाजासमोर एक यशस्वी आदर्श व आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. प्रारंभी विवाहाविरोधात असलेले कुटुंबीयही आज त्यांच्या या यशामुळे आनंदी व समाधानी आहेत आणि हे उदाहरण समाजात सकारात्मक परिवर्तन घडवणारे ठरत आहे.

# अनिल भुतेकर यांच्या निवडीबद्दल तुगांव गावच्या वतीने सत्कार



आरंभ मराठी | धाराशिव

भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक मजबुतीसाठी भारतीय जनता पक्षाचे नूतन जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी व भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाच्या मान्यतेनुसार धाराशिव जिल्ह्यातील पक्षाचे संघटनात्मक काम अधिक जोमाने व बळकट व्हावे यासाठी संघटनात्मक बांधणीच्या पातळीवर जिल्ह्यातील आठ मंडळासाठी नवीन अध्यक्षांच्या निवडी करण्यात आल्या आहेत. यामध्ये तुगांव येथील संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती धाराशिव तथा माजी सरपंच अनिलभाऊ भुतेकर यांची धाराशिव ग्रामीण पश्चिम मंडल अध्यक्षपदी नियुक्ती होताच तुगांव ग्रामस्थ व मित्रपरिवार यांच्या वतीने त्यांचा सत्कार तुगांव येथे करण्यात आला. त्यांना गावच्या वतीने पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. तुगांव आपल्या पूर्ण ताकतीने पाठीशी आहे असा विश्वास देण्यात आला.बोलताना शिक्षक दत्ता हाजगुडे, विकास शेंडगे, सचिन लोमटे, राजकुमार भुतेकर, हरिश्चंद्र गडकर,रघुनाथ लोमटे यांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास गावातील सर्व नागरिक सर्व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवडीमुळे पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवून संघटनात्मक बांधणी बळकट करून तळागळातील काम करणाऱ्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला बळ मिळेल. ही जबाबदारी सर्वांना सोबत घेऊन पार पाडतील असा विश्वास यावेळी नागरिकांनी व्यक्त केला. निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन व शुभेच्छा देऊन स्वागत होत आहे.

# धाराशिवमध्ये वीरशैव लिंगायत बंधूंची दुसरी परिसंवाद बैठक



आरंभ मराठी | धाराशिव


शहरातील शासकीय विश्रामगृहात सकल वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने जाती पोटजातीसह बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समाजाचे जेष्ठ सिद्धेश्वर बेलुरे यांचा वाढदिवस वाढदिवस साजरा करण्यात आला.यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक भालचंद्र हुच्चे, राजाभाऊ माळी, विठ्ठल खरे, गिरीश पाळणे, अक्षय ढोबळे, ओंकार चिंचनसुरे, नाना कळसकर, सोमनाथ बेलुरे, अमोल लोहार, अजय वाघाळे, अमर मैराण, श्रीराम शिराळ, सुदर्शन बेलुरे, चेतन माशाळकर, दयानंद नागापुरे, अर्जुन साखरे, सागर शेरकर, अनिल उंबरे, श्री विठ्ठल आप्पा खरे, प्रसन्न कथले, मल्लिकार्जुन आपचे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. आयोजक महेश उपासे यांनी लवकरात लवकर वीरशैव समाजातील गुणवंताचा तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# सुशील शेळके यांना पीएचडी

आरंभ मराठी | धाराशिव

कळंब येथील शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर कनिष्ठ महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे प्रा. सुशील शेळके यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.

सुशील शेळके यांनी ''सिंथेसिस ऑफ झिर्कोनिया बेस्ड मिक्स ऑक्साईड सॉलिड ऍसिड कॅटलिस्ट, कॅरेक्टरिझेशन अँड एप्लीकेशन इन ऑरगॅनिक सिंथेसिस'' या विषयावर यशस्वीपणे संशोधन पूर्ण केले. त्यांचे हे संशोधन, या क्षेत्रातील नामवंत मार्गदर्शकडॉ.मेघशामके.पाटीलयांच्या मार्गदर्शनाखाली झाले. डॉ. पाटील यांचे फ्रान्स व यू.एस.ए.मधील संशोधनाच्या धर्तीवरच हे संशोधन आधारित असून, नॅनो पार्टिकल बेस्ड मिक्स्ड ऑक्साईड सॉलिड ऍसिड कॅटलिस्ट यासंबंधी हे महत्त्वाचे संशोधन मानले जाते. सदरील परीक्षा यशस्वीरित्या पार पडली. या परीक्षेसाठी विषयतज्ञ म्हणून डॉ. लावंद मॅडम (संचालिका,



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर) यांनी काम पाहिले. तर परीक्षेचे चेअरमन म्हणून डॉ. सुनील शंकरवार (विभागप्रमुख, रसायनशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर) यांनी जबाबदारी पार पाडली. या उल्लेखनीय यशाबद्दल लातूर विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुधाकर तेलंग,सहसचिव श्री. ए. आर. कुंभार, डॉ.भास्कर साठे, (मराठवाडा विद्यापीठ संचालक छत्रपती संभाजीनगर),डॉ. के. पी. हवाळ (विभागप्रमुख, रसायनशास्त्र विभाग, डॉ. बा. आ. म. वि. उपकेंद्र, धाराशिव), ज्ञानप्रसारक मंडळ येरमाळा संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल मोहेकर, सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, डॉ. संभाजी धुमाळ, डॉ. संदीप देशमुख, डॉ. राधाकृष्ण तीगोटे यांनी डॉ. सुशील शेळके यांचे अभिनंदन केले आहे.

# डॉ. ढोबळे यांची जय मल्हार क्रांती संघटनेच्या आरोग्य अध्यक्षपदी निवड



आरंभ मराठी | मुरूम

मुरुम येथील डॉ. खाजालाल ढोबळे यांची जय मल्हार क्रांती संघटनेच्या धाराशिव जिल्हा आरोग्य विभागाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ही निवड संघटनेचे राज्याध्यक्ष अंकुशराव जाधव यांनी अधिकृत नियुक्तीपत्र देऊन जाहीर केली. शनिवारी (ता.७ जून) रोजी उमरगा येथील शासकीय विश्रामगृहात बेरड, बेडर, रामोशी समाजबांधवांसाठी आयोजित संवाद मेळाव्याच्या निमित्ताने जय मल्हार क्रांती संघटनेच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांनी जिल्हा व तालुकास्तरावरील नवीन कार्यकारिणीची घोषणा केली. यावेळी डॉ. ढोबळे यांची आरोग्य विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड जाहीर करून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कारही करण्यात आला. डॉ. ढोबळे हे गेल्या अनेक वर्षांपासून वैद्यकीय, सामाजिक व जनजागृती क्षेत्रात सक्रिय आहेत. ग्रामीण भागातील आरोग्य विषयक प्रश्नांवर त्यांचे विशेष लक्ष असून, त्यांनी अनेक सामाजिक उपक्रमांत सक्रीय सहभाग घेतला आहे. त्यांच्या या निवडीबद्दल मुरूम शहर व परिसरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## महावितरणचा वर्धापन दिन उत्साहात

धाराशिव -महावितरण कंपनीचा २० वा वर्धापन दिन शहरातील मंडळ कार्यालय रिसरात विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.वर्धापन दिनानिमित्त मंडळ कार्यालयाची सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली होती.शुक्रवार, ६ जून रोजी महावितरणचा वर्धापन दिन स्वस्तिक मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी जवळपास एक हजार विद्युत अधिकारी, कर्मचारी, कंत्राटी कामगार व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी कार्यकारी अभियंता (प्रशासन) निलांबरी कुलकर्णी,तुळजापूर विभागाचे कार्यकारी अभियंता नंदकुमार काळे, धाराशिव विभागाचे कार्यकारी अभियंता नरेंद्र रडे,व्यवस्थापक दिलीप पाटोळे आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून व वर्धापन दिनानिमित्त केक कापण्यात आला. महावितरणच्या वर्धापन दिनानिमित्त १ ते ५ जून दरम्यान जिल्ह्यात सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला.

# मराठवाडा साहित्य परिषदेच्या तुळजापूर शाखेची नवीन कार्यकारिणी जाहीर

आरंभ मराठी | तुळजापूर

मराठवाडा साहित्य परिषद, शाखा तुळजापूरची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून दिनांक ८ जून २०२५ रोजी मराठवाडा साहित्य परिषद तुळजापूर शाखा कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यात शाखेची नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली. ज्येष्ठ सदस्य देवेंद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीत पूर्वीच्या कार्यकारिणीला एकमताने मुदतवाढ देण्यात आली. साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी अमर हरिश्चंद्र हंगरगेकर, उपाध्यक्ष अरुण कुलकर्णी, कार्यवाह विजय देशमुख, कोषाध्यक्ष महेश गवळी, सहकार्यवाह ॲड. ओंकार मस्के, सह कोषाध्यक्ष महेश गुरव, संघटक संदीप गंगणे व तुषार सुत्रावे, कार्यालयीन प्रमुख दास पाटील, प्रसिद्धी प्रमुख प्रा. विवेक कोरे यांची एकमताने फेरनिवड करण्यात आली.

कार्यकारणी सदस्य मंडळात पंडितराव जगदाळे, राजेश शिंदे, किरण हंगरगेकर, भीमा सुरवसे, जीवनराजे इंगळे, अविनाश सराटे, आण्णासाहेब क्षीरसागर यांचा समावेश करण्यात आला.याप्रसंगी मराठवाडा साहित्य परिषद शाखेद्वारे लवकरच शहरातील वाचकांसाठी सुसज्ज ग्रंथालय सुरु करण्यात येत असल्याची माहिती शाखा अध्यक्ष अमर हंगरगेकर यांनी दिली. तसेच तुळजापूर शहरातून इ. १० मध्ये मराठी भाषा विषयातून प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांच्या क. भ. प्रयाग स्मृती मराठी भाषा पारितोषिक देऊन सत्कार समारंभाचे आयोजनही शाखेच्या वतीने केले जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले. बैठकीचे सूत्रसंचालन ॲड. ओंकार मस्के यांनी केले. सदरील बैठकीस शाखेचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुरुममध्ये खरीप हंगाम मोहीम व बियाणे प्रकिया विषयक मार्गदर्शन बैठक;शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

आरंभ मराठी | मुरुम



येत्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मुरुम येथे सोमवारी (९ जून) कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगाम मोहीम, बीज प्रकिया, घरगुती बियाणे तपासणी, गोगलगाय निर्मूलन व इतर विविध विषयांवर सविस्तर माहिती देण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस सहाय्यक कृषी अधिकारी बळीराम जाधव, युवा प्रशिक्षणार्थी कर्मचारी किशोर शिंदे व अविनाश च्यारे, तसेच परिसरातील अनेक प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रकाश इंगोले, श्रीधर इंगळे, नंदकुमार शिंदे, विशाल व्हनाळे, पिंटू सोबाजी, आप्पासाहेब बोराळे, काशिनाथ सरवडे, रोहित फूगटे, मुन्ना लोणी, गोटू कदम यांचा सहभाग उल्लेखनीय होता. बैठकीत घरगुती बियाण्यांची उगवण क्षमता तपासण्याच्या पद्धती, बीजप्रक्रियेसाठी आवश्यक रसायने, पाणी प्रमाण व प्रक्रिया कालावधी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. गोगलगाय या कीटकाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, त्यावर प्रभावी उपाययोजना कशा कराव्यात याचे प्रात्यक्षिक स्वरूपात मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच शेतकऱ्यांनी फॉर्मर आयडी कसा तयार करावा, त्याचा उपयोग व शासनाच्या कृषी विभागातील विविध योजनांचा लाभ घेण्याच्या प्रक्रिया यावर देखील मार्गदर्शन करण्यात आले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देत कृषी विभागाने खरीप हंगामासाठी सज्जता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. बैठकीचे आयोजन यशस्वी झाल्याबद्दल उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

# अमोल जाधव यांची शिवसेनेच्या तुळजापूर तालुकाप्रमुखपदी निवड

आरंभ मराठी | तुळजापूर



शिवसेना पक्षप्रमुख आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार आणि शिवसेना मध्यवर्ती कार्यालयाच्या वतीने अमोल शिवाजीराव जाधव यांची तुळजापूर तालुका प्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारसरणीच्या अधिष्ठानावर कार्य करत शिवसेना पक्षाची तुळजापूर तालुक्यातील धुरा अमोल जाधव सांभाळणार आहेत. हे पद त्यांना एक वर्षासाठी देण्यात आले असून, पक्षवाढीसाठी ते सक्रीयपणे काम करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. या नियुक्तीबद्दल अमोल जाधव यांनी पक्षाच्या नेतृत्वाचे आभार मानले असून, ''बाळासाहेबांच्या विचारांचा प्रसार करणे हेच माझे प्रथम कर्तव्य असेल. कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पक्षबांधणीला प्राधान्य देईन,'' असे ते म्हणाले.

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

आपलं धाराशिव.

मंगळवार दि.10 जून 2025

# शिराढोणच्या जिल्हा परिषद शाळेत माजी विद्यार्थ्यांचा पन्नास वर्षानंतर स्नेहमेळावा

## १९७४ च्या दहावीच्या विद्यार्थ्यांची पुन्हा रंगली मैफल; अनेकांचे डोळे पाणावले

अमोलसिंह चंदेल | आरंभ मराठी

शिराढोण –कळंब तालुक्यातील शिराढोण येथील पुर्वीची जिल्हा परिषद प्रशाला व आत्ताची अटलबिहारी वाजपेयी अंतरराष्ट्रीय पीएमश्री जिल्हा परीषद प्रशालेत सन १९७४ साली दहावित असणाऱ्या ६५ वर्षीय माजी विद्यार्थ्यांनी नियोजन करुन दिनांक ८ जून रोजी शाळेत स्नेह मेळावा व त्यांच्या गुरुजनांचा सन्माण सोहळा घडवून आणला. हा माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा गावातील भूमीपुत्र व या शाळेचे माजी विद्यार्थी सध्या मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळावर प्रशाकिय अधिकारी म्हणून कर्तव्य बजावणा फूलचंद माळी व सतिश कोंडेकर यांच्या संकल्पनेतून आयोजीत करण्यात आला होता. यावेळी पन्नास वर्षानंतर भेटणारे अनेकजण भावूक झाले.

या स्नेहमेळाव्यात कार्यक्रमाचे प्रास्ताविक फुलचंद माळी यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शाळेचे माजी विद्यार्थी दस्तगिर शेख तर आभार सतिश कोंडेकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थ्यांमध्ये दिलीप महाराज कापसे, मदन खटोड, श्रीकीशन जाजू, जंबू खडबडे, श्रीहरी माळी, आयूब खुरेशी, राजेश परदेशी, विश्वासराव पाटील यांच्यासह शेकडो माजी विद्यार्थी तसेच शाळेत सध्या कार्यरत असलेल्या सहशिक्षीका सुनीता पोतदार, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोलसिंह चंदेल, वरुन पाटील आदींची उपस्थिती होती.

या स्नेह मेळाव्यात या ६५ वर्षीय माजी विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय जीवनात मार्गदर्शन करणारे शिक्षक आनंदराव जाधवर, भागवत बर्वे व दिगंबर गव्हाणे यांचा सापत्नीक यथोचित सन्माण या माजी विद्यार्थ्यांनी केला व त्याचे ऋण व्यक्त केले. सन १९७४ ची दिसणारी शाळा आणि आज दिसणारी शाळा यामध्ये मोठा बदल झालेला आहे. या कार्यक्रमात शाळेचा झालेला कायापालट या विषयी या विद्यार्थ्यांची चर्चा रंगली होती. या माजी विद्यार्थ्यांचे वय जरी झाले असले तरी देखील शाळेत आल्यानंतर मात्र त्यांचे वय विसरुन त्यांनी जुण्या आठवणींना उजाळा देत या स्नेह मेळाव्याचा आनंद लुटला. आजच्या तरुणाईला लाजवेल अशी प्रकृती या ६५ वर्षीय काही विद्यार्थ्यांनी जपलेली दिसली. या वयात या स्नेह मेळाव्यात त्यांच्या गुरुजनांचा सन्मान करुन त्यांनी आजच्या पिढीसमोर एक आदर्श निर्माण केला. या माजी विद्यार्थ्यांनी आपण आपल्या शाळेसाठी काहीतरी देणं लागतो या पवित्र भावनेतून शाळेच्या ऑफिसमध्ये मध्ये एक शोकेस करण्यासाठी निधी दिला. तसेच शाळेच्या एका हॉलमध्ये दोन फॅन देण्यात आले. शाळेसाठी आणखीन काय कम तरता आहे त्या उपलब्ध करुन देण्याची सर्व माजी विद्यार्थ्यांनी संकल्प केला.याच कार्यक्रमात शाळेसाठी जमीन दान दिलेले कै.सुरजमलजी रामकिसनजी मुंदडा यांचे पणतू प्रथमेश उर्फ राधे रमण मुंदडा यांचाही विशेष सन्मान यावेळी करण्यात आला.




### शाळेत घेतला भोजनाचा आस्वाद

जिल्हा परिषद प्रशाला शिराढोण येथे आयोजित स्नेह मेळावा व गुरुजनांना सन्मान या कार्यक्रमानंतर सर्वांची भोजनव्यवस्था करण्यात आली होती. ज्या शाळेत दुपारचे जेवन १० वर्ष केले त्याच शाळेत तब्बल ५० वर्षांनी सर्व माजी विद्यार्थ्यांनी अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात गुरुजनांसोबत भोजनाचा अस्वाद घेतला.

### चार महिन्यांपासून केले कार्यक्रमाचे नियोजन

५० वर्षापुर्वीच्या मित्रांचा योग जुळवून आणण्यासाठी या समूहातील फुलचंद माळी, सतिश कोंडेकर, दस्तगिर शेख, विश्वासराव पाटील, राजेश परदेशी आदी वर्गमित्र मिळून चार महिन्यांपासून नियोजन करत होते. अनेकांचे संपर्क क्रमांक मिळवणे, बैठका घेणे आदी बाबी त्यांनी या मेळाव्यासाठी पार पाडल्या. १९७४ च्या बॅचचे जवळपास ८० टक्के माजी विद्यार्थी हे बाहेर गावी राहत असल्यामुळे सगळ्यांशी संपर्क करणे कठीण होते. तरीही सर्वांशी संपर्क साधून कार्यक्रम यशस्वी केला.

### ५० वर्षापूर्वीच्या आठवणी..

पन्नास वर्षानंतर आणि तेही त्यांच्या शाळेत भेटण्याचा योग म्हणजे अनेकांसाठी खुप मोठी मेजवानीच होती. दिनांक जून रोजी जय्यत तयारी करुन अनेक मित्र सकाळी ८ वाजल्यापासूनच शाळेत उपस्थित होते. सकाळी ११ वाजेपर्यंत या शाळेत ६५ माजी विद्यार्थी विविध शहरातून, गावातून शाळेत दाखल झाले होते. त्यांनी १९७४ सालच्या आठवणींना उजाळा दिला. शालेय जीवनातील आठवणी जाग्या करत अनेकांचा कंठ यावेळी दाटून आला आणि डोळे पाणावले.

# अनाधिकृत दारू विक्री, कारवाईच्या मागणीसाठी गावकऱ्यांचे उपोषण




आरंभ मराठी| माडज

उमरगा तालुक्यातील कोळीवाडा गावामध्ये भगवती देवी मंदिर पाटी येथे अनाधिकृत दारू विक्री खुलेआम चालू आहे. या दारूमुळे महिलांना व इतर भाविक भक्तांना त्रास होत आहे, तसेच रस्त्यावर उभारून दारूच्या बाटल्या फोडल्या जातात. व गावातील शेळ्या बकऱ्या चोरीस जातात,त्यामुळे दारूविक्री बंद करण्याच्या मागणीसाठी गावकऱ्यांनी उपोषण सुरू केले आहे.आंदोलकांनी म्हटले आहे की, दारू पिणारे हाताम ध्ये चाकू घेऊन धमक्या दाखवत आहेत. आमचे कोणीही काही करू शकत नाही, असे म्हणत खुलेआम रस्त्यावर बसून दारू पितात. यामुळे लोकांना व गावकऱ्यांना त्रास होत आहे. गावातील अनेक मोटारी चोरीला जातात. त्यामुळे दारूविक्री बंद करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. या उपोषण आंदोलनात उपोषणामध्ये बलभीम बळीराम इरले,वंदना बलभीम इरले,सुषमा रवींद्र कावले,कोराबाई अशोक भोसले,जगदेवी राजेंद्र कावले,अनुसया प्रकाश कावले,लक्ष्मी सोमनाथ पालमपल्ली, गुणवंता संभाजी पालम पली, जयमाला पंढरीला लाजरे यांनी सहभाग घेतला आहे.

# सहायक समाज कल्याण आयुक्त सचिन कवले यांचा सत्कार

आरंभ मराठी | तेर



मुक्ताई संस्थेच्या वतीने धाराशिवचे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण आयुक्त सचीन कवले यांचा मुक्ताई बहुउदेशीय सामाजिक संस्था धाराशिव या संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. दिनांक ९ जून रोजी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग यांची नियुक्ती झाल्याने सचिन कवले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सोमनाथ गायकवाड, आर पी आय तालुका अध्यक्ष भालचंद्र कटारे, सामाजिक कार्यकर्ते समाधान सरवदे, अंगुल माने, रविकांत कांबळे, सुशील शिंदे, किरण आवटे व तसेच समाज कल्याण अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# एकाच दिवशी १५ लाख वृक्ष लागवड करण्याचा जिल्हा प्रशासनाचा निर्धार

## जिल्हाधिकारी कीर्ती करण पुजार यांनी घेतला मोहिमेचा आढावा





आरंभ मराठी | धाराशिव

राज्यात या पावसाळ्यात दहा कोटी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. तर धाराशिव जिल्ह्यात ५० लक्ष वृक्ष लागवड करण्यासाठी प्रत्येकाने आपले कर्तव्य पार पाडावे. येत्या १९ जुलै रोजी एकाच दिवशी जिल्ह्यात १५ लक्ष वृक्ष लागवड करून धाराशिवकरांनी नवा आदर्श निर्माण करावा असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले. जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन मोहिमेच्या अनुषंगाने जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदार, बँक अधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य व मुख्याध्यापक यांच्या आयोजित सभेत पुजार बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी (रोहयो) प्रवीण धरमकर, विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) व्ही.के करे, जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधा साळुंखे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अशोक पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. पूजार पुढे म्हणाले की, ज्या ठिकाणी पाण्याचे स्त्रोत आहेत, अशा ठिकाणची निवड वृक्ष लागवडीसाठी करण्यात येणार आहे. १९ जुलै रोजी घनवन वृक्ष लागवडीतून १५ लक्ष वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. प्रत्येकाने नेमून दिलेल्या ठिकाणी वृक्ष लागवडीसाठी उपस्थित राहावे. १५ लक्ष वृक्ष लागवडीच्या समन्वयासाठी नोडल अधिकारी नियुक्त केले आहे असे त्यांनी सांगितले. धरमकर म्हणाले की, जिल्ह्यात ६२२ ग्रामपंचायती आणि दहा नगरपालिका, नगरपंचायती आहेत. दोनशे ग्रामपंचायतीची नोंदणी घनवन वृक्ष लागवडीसाठी करण्यात आली आहे. १९ जुलै रोजी १५ लक्ष वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. यामध्ये सर्वांनी सहभागी व्हायचे आहे. त्यांना संमतीपत्र द्यावे लागणार आहे. सर्वांच्या सहभागातून घनवन वृक्ष लागवड करण्यात येणार आहे.१९ जुलै रोजी सकाळी ६ वाजता राष्ट्रगीत आणि वृक्ष लागवडीची शपथ घेऊन सकाळी ७ वाजता वृक्ष लागवडीला सुरुवात करण्यात येणार आहे. स्वस्त धान्य दुकानदारांनी शिधापत्रिकाधारकांमध्ये या मोहिमेची व्यापक प्रचार प्रसिद्धी करून वृक्ष लागवडीसाठी जनजागृती करावी. असे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थितांनी वृक्ष लागवडीसाठी काही सुचना करून वृक्ष लागवडीसाठी करण्यात आलेल्या तयारीची माहिती दिली.

# वसतिगृह प्रवेश प्रक्रिया उद्यापासून; गुणवत्तेनुसार ऑनलाईन पधदतीने मिळणार वसतिगृहात प्रवेश

आरंभ मराठी | धाराशिव

मागासवर्गीय मुला–मुलींसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून शासकीय वसतिगृहे ही योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत धाराशिव जिल्ह्यात एकूण ११ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षासाठी वसतिगृह प्रवेश प्रक्रिया दिनांक ११ जून २०२५ पासून ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी दिली. या प्रवेश प्रक्रियेअंतर्गत शालेय, कनिष्ठ महाविद्यालय, व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास अर्ज स्वीकारले जातील. शासकीय वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल. जे विद्यार्थी वसतिगृहात प्रवेश मिळवू शकत नाहीत, त्यांच्यासाठी 'स्वाधार' ही योजना उपलब्ध आहे. मात्र, 'स्वाधार' योजनेसाठीही वसतिगृह प्रवेशाकरिता ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. अर्ज :/ https://hmas.mahait.org/.. या अधिकृत वेबसाईटवर ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. त्यामुळे इच्छुक मागासवर्गीय विद्यार्थी व विद्यार्थीनींनी विहित मुदतीत अर्ज भरून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी केले आहे.

# ब्राह्मण ट्रस्टच्या वतीने समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान




धाराशिव–ब्राह्मण कल्याण ट्रस्टच्या वतीने येथील परिमल मंगल कार्यालयात समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी खासदार मेधा कुलकर्णी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तर प्रमुख पाहुण्या म्हणून माजी नगराध्यक्ष तथा यशस्वी उद्योजिका डॉ. उर्मिला गजेंद्रगडकर, जेष्ठ लेखीका, निवेदिका अर्पणा कुलकर्णी यांची उपस्थिती होती.यावेळी खासदार मेधा कुलकर्णी म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी करिअरच्या वाटा निवडताना राजकारण, सैन्यदलाचाही अग्रक्रमाने विचार केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी सजग राहून आपल्या आजूबाजूला काय घडतय हे डोळे उघडून पाहिले पाहिजे. प्रत्येक जाती, धर्माचा आदर करा मात्र प्रलोभनांना बळी पडू नका, कोणतेही अभ्यासपुर्ण केलेले कार्य हे यशस्वी होतेच, पंखात बळ आणून उंच उडा असे आवाहनही त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले. विद्यार्थ्यांनी त्याच्या आवडीचे क्षेत्र निवडावे म्हणजे त्यात यश मिळते असे डॉ. उर्मिला गजेंद्रगडकर म्हणाल्या. तर समजून उमजून अभ्यास केला तर हा अभ्यास आयुषभर उपयोगी पडतो. आपल्या मुलाला यंत्र बनवण्यापेक्षा चांगला माणूस म्हणून घडवा. आपल्या अपेक्षा मुलांवर लादू नका. त्याला सामाजिक दृष्ट्या सक्षम बनवा. मुलांशी संवाद साधा. त्याना नियोजन कौशल्ये शिकावा, मार्कांच्या गणितावर आयुष्याचे गणित अवलंबुन नसते असे परखड मत अर्पणा कुलकर्णी यांनी व्यक्त केले.या सोहळ्यात १० वी, १२ वी मधील ७० गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, गुलाबपुष्प, प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला. याच कार्यक्रमात ऋगवेद शाखा संहिता परिक्षा पास झाल्याबद्दल पुरोहित वैभव विजयकुमार घुगीकर, अनिरुध्द मुकूंद कुलकर्णी या दोघांचाही मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुजा गंधोरकर, सुत्रसंचालन डॉ. स्वप्नगंधा कुलकर्णी तर उपस्थितांचे आभार अर्पणा पाठक यांनी मानले.

# डॉ.श्रेयस राऊत यांच्या वैद्यकीय अधिकारीपदी नियुक्तीबद्दल सत्कार

आरंभ मराठी | तुळजापूर



तुळजापूर येथील पुजारी नगर सोसायटीमधील डॉ.श्रेयस भारत राऊत यांना सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुका शासकीय रुग्णालय येथे वैद्यकीय अधिकारी पदी नियुक्ती मिळाल्याबद्धल त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ.श्रेयस राऊत यांनी सोलापूर येथील डॉ. व्ही.एम. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस ही पदवी प्राप्त केली आहे. नळदुर्ग येथील शासकीय रुग्णालयातील परिचारिका श्रीमती चंद्रभागा मस्तुद राऊत यांनी रुग्णांची सेवा करत मुलाला डॉक्टर बनवण्याचे स्वप्न पाहिले आणि मुलानेदेखील आईचे स्वप्न पूर्ण केले. पुजारी नगर सोसायटी फाऊंडेशनच्या वतीने डॉ.श्रेयस राऊत व त्यांच्या मातोश्री चंद्रभागा मस्तुद राऊत यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सातारा जिल्हा रुग्णालयातील प्रशासकीय अधिकारी डॉ. स्मिता लोंढे, पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी, कार्याध्यक्ष श्रावण पवार, रावसाहेब शिंदे, हरिदास नाईकवाडी, भक्ती राऊत, उज्वला लोंढे, विश्वास मोटे,सिद्धेश्वर इंगोले,लिंबाजी पुजारी, प्रतीक कांबळे आदी उपस्थित होते.

# अक्षर चळवळीतून नव समाज निर्मिती शक्य

## प्राचार्य संजीव गिरासे यांचे मत

आरंभ मराठी | धाराशिव






माहिती तंत्रज्ञान झपाट्याने वाढत असल्यामुळे सांस्कृतिक संकल्पना प्रचंड गतीने बदलत आहे. याबदलामुळे भारतीय संस्कृतीची मूल्ये मोडीत निघत असून, नवसमाज मूल्ये बाळसे धरायला लागली आहेत. भारतीय संस्कृतीचा कणा म्हणून कुटुंब व्यवस्थेकडे पाहिले जाते. कुटुंब व्यवस्था मोडीत निघण्याच्या या काळात युवकांच्या समृद्ध लेखनातून अक्षर चळवळीतून नव समाज निर्मिती शक्य होईल, असे मत अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती देवगिरी प्रांत अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय गिरासे यांनी व्यक्त केले.

येथील कलाविष्कार अकादमी, अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्था व अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कथा स्पर्धेतील विजयी स्पर्धक साहित्यिक, गुणवंत साहित्यिक शिक्षक, इयत्ता दहावी–बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थी यांच्या अभिनंदन सोहळ्यात अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. कलाविष्कार अकादमीचे मल्हारी माने, ॲड विद्युल्लता दलभंजन, नितीन बनसोडे, डी जी कुलकर्णी, महेश उंबरगीकर, वर्षा नळे समूहाच्या महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, साहित्य भारती प्रदेश कार्यकारिणीचे उपाध्यक्ष डॉक्टर रविंद्र बेंबरे, रा.प. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख यांनीही समयोचित उद्बोधक मार्गदर्शन केले. प्रास्ताविक कलाविष्कार अकादमी, बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष तथा अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती देवगिरी प्रांत मंत्री युवराज नळे यांनी प्रास्ताविक करताना गुणवंतांचा सत्कार करुन सार्वजनिक रित्या पाठीवर कौतुकाची थाप टाकणे हे सकस समाज निर्मितीसाठी आवश्यक असते व गेल्या सतरा वर्षांपासून हा उपक्रम आपण करत आहोत असे सांगितले. यावेळी मंचावर ज्येष्ठ कवी राजेंद्र अत्रे, शिक्षण विस्तार अधिकारी मल्हारी माने, साहित्य भारतीचे कार्यवाह रविंद्र शिंदे, बालकुमार साहित्य संस्थेचे कार्यवाह समाधान शिकेतोड, प्राचार्य प्रशांत चौधरी, शंकरराव नळे यांची प्रमुख उपस्थिती होती. हनुमंत पडवळ, कृष्णा साळुंके, युसुफ सय्यद, अविनाश मुंढे, देविदास पाठक यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक व पालकांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. सूत्रसंचालन मराठी भाषा समितीचे जिल्हा सदस्य भैरवनाथ कानडे यांनी केले तर हनुमंत पडवळ यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सांगाता कलाविष्कारचे मुकुंद पाटील यांच्या पसायदानाने झाली.

# मराठवाडा जनता विकास परिषदेची जिल्हा कार्यकारणी जाहीर

आरंभ मराठी | धाराशिव

मराठवाडा जनता विकास परिषद जिल्हा शाखा धाराशिवची बैठक संघटनेचे कार्यालय अंजली निवास, भाई उध्दवराव पाटील पतसंस्थेसमोर छत्रपती शिवाजी हायस्कूल, धाराशिव जवळील कार्यालयात ६ जून रोजी प्रा. अर्जुन जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. गेल्या अनेक दशकापासून संघटना मराठवाडयाच्या विकास प्रश्नावर लोकशाहीच्या माध्यमातून कार्य करत आहे. यावेळी संघटनेची जिल्हयाची नुतन कार्यकारणीची निवड करण्यात आली. यावेळी अध्यक्ष म्हणून सुरेश शेळके, उपाध्यक्ष म्हणून महेश पोतदार, सचिव विजय गायकवाड, कोषाध्यक्ष सागर जाधव, जिल्हा कार्यकारणी सदस्य धनंजय पाटील, धर्मवीर कदम, प्रा. अर्जुन जाधव, डी.एम. पाटील, नवनाथ पवार, सुभाष चव्हाण, श्रीहरी लोखंडे, प्रा. धनंजय लोंढे, युनुस पटेल, अमोल घोगरे, ॲड. चैतन्य वीर यांची निवड करण्यात आली.संघटनेच्या धाराशिव तालुकाध्यक्षपदी शामराव लावंड, कळंब तालुकाध्यक्षपदी दिपक बारकुल, तुळजापूर तालुकाध्यक्षपदी प्रा. धनंजय लोंढे यांची निवड करण्यात आली.बैठकीत संघटनेच्या केंद्रीय कार्यकारणीवर धाराशिव जिल्हा कार्यकारणीतून प्रा. अर्जुन जाधव व कामगार नेते डी.एम. पाटील यांची निवड करण्यात आली.